भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, १९९४

(१९९४ चा अधिनियम क्रमांक ४२)

[१ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The Transplantation of Human Organs Act, 1994

**(Act No. 42 of 1994)**

[*As in force on the 1st March 1998*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९९

[ किंमत : ३ रुपये ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि ट्रान्सप्लान्टेशन ऑफ ह्युमन ऑरगन्स ॲक्ट, १९९४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९ अंक १, दिनांक ८ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ २१ ते २९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ८ ऑक्टोबर १९९८.

डॉ. रघबीर सिंग,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Transplantation of Human Organs Act, 1994 as on the 1st March 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in Gazette of India, Extraordinary Part XII, Section 1, No. 1 Vol. 9, dated 8th October on pages 21 to 29.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2 Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
dated 8th October, 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, १९९४

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक

#### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

#### मानवी अवयव काढून घेण्यासाठी प्राधिकार

३. मानवी अवयव काढून घेण्यासाठी प्राधिकार.

४. विवक्षित प्रकरणांमध्ये मानवी अवयव काढून घेण्याचे प्राधिकार न देणे.

५. रुग्णालय किंवा कारागृह येथील दावा न सांगितलेल्या मृतदेहांच्या बाबतीत मानवी अवयव काढण्याचा प्राधिकार.

६. मरणोत्तर तपासणीसाठी पाठवण्यात आलेल्या मृतदेहातून न्याय, वैद्यक किंवा विकृत चिकित्सेच्या प्रयोजनांसाठी मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार.

७. मानवी अवयवांचे जतन करणे.

८. व्यावृत्ती.

९. मानवी अवयव काढून घेणे व त्याचे शरीरावर प्रतिरोपण करणे यावरील मर्यादा.

### प्रकरण तीन

#### रुग्णालयांचे नियमन

१०. मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन व प्रतिरोपण ही कार्ये पार पाडणाऱ्या रुग्णालयांचे नियमन.

११. उपचाराच्या प्रयोजनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रयोजनाकरिता मानवी अवयव काढून घेण्या- किंवा त्याच्या प्रतिरोपणास प्रतिषेध.

१२. दाता व ग्रहीता यांना परिणाम इत्यादींची, स्पष्ट कल्पना देणे.

### प्रकरण चार

#### समुचित प्राधिकरण

१३. समुचित प्राधिकरण.

### प्रकरण पाच

#### रुग्णालयांची नोंदणी

१४. मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन करणे किंवा त्यांचे प्रतिरोपण करणे या कामी गुंतलेल्या रुग्णालयांची नोंदणी.

१५. नोंदणी प्रमाणपत्र.

१६. नोंदणी निलंबित किंवा रद्द करणे.

१७. अपिले.

## प्रकरण सहा

### अपराध व शास्ती

१८. प्राधिकाराशिवाय मानवी अवयव काढण्याबद्दल शिक्षा.
१९. मानवी अवयवांच्या वाणिज्यिक व्यवहाराबद्दल शिक्षा.
२०. या अधिनियमांच्या इतर कोणत्याही उपबंधांच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
२१. कंपन्यांनी केलेले अपराध.
२२. अपराधाची दखल घेणे.

## प्रकरण सात

### संकीर्ण

२३. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीला संरक्षण.
२४. नियम करण्याची शक्ती.
२५. निरसन व व्यावृत्ती.

# मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, १९९४

(१९९४ चा अधिनियम क्रमांक ४२)

(१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[८ जुलै, १९९४]

उपचाराच्या प्रयोजनासाठी मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन करणे आणि प्रतिरोपण करणे यांचे विनियमन करण्याकरिता आणि मानवी अवयवांच्या वाणिज्यिक व्यवहारास प्रतिबंध करण्याकरिता व त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, उपचाराच्या प्रयोजनासाठी मानवी अवयव काढून घेणे, ते जतन करणे व त्यांचे प्रतिरोपण करणे, यांचे विनियमन करण्याकरिता व मानवी अवयवांच्या व्यापारास प्रतिबंध करण्याकरिता उपबंध करणे इष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, संसदेला, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४९ व २५० मध्ये उपबंधित केले आहे त्याखेरीज, उपरोक्त कोणत्याही बाबीसंबंधात राज्यांकरिता कायदे करण्याची शक्ती नाही;

आणि ज्याअर्थी, संविधानाचा अनुच्छेद २५२, खंड (१) यास अनुलक्षून गोवा, हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र राज्यांच्या विधानमंडळांच्या सर्व सभागृहांनी असा ठराव संमत केला आहे की, त्या राज्यात उपरोक्त बाबींचे नियमन संसदेने कायद्याद्वारे करावे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, १९९४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, प्रथमतः गोवा, हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र या संपूर्ण राज्यांना आणि सर्व केंद्रशासित प्रदेशांना लागू होतो आणि जी राज्ये हा अधिनियम संविधानाच्या अनुच्छेद २५२, खंड (१) अन्वये त्याबाबतीत संमत केलेल्या ठरावाद्वारे स्वीकारतील त्या सर्व इतर राज्यांनाही लागू होईल.

(३) तो, गोवा, हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र या राज्यामध्ये आणि सर्व केंद्रशासित प्रदेशांमध्ये, केंद्रशासन, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल आणि जे राज्य संविधानाच्या अनुच्छेद २५२, खंड (१) अन्वये हा अधिनियम स्वीकारील त्या अशा इतर कोणत्याही राज्यामध्ये अशा स्वीकृतीच्या दिनांकास अंमलात येईल, आणि या अधिनियमातील, या अधिनियमाच्या प्रारंभाबाबतच्या कोणत्याही राज्यांच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या संदर्भातील कोणत्याही निर्देशाचा अर्थ, त्या राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात तो अधिनियम अंमलात येणारी तारीख, असा आहे.

२. या अधिनियमास, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "जाहिरात" यामध्ये, जाहिरातीच्या कोणत्याही प्रकारचा मग ती सर्वसाधारण जनतेसाठी असो किंवा जनतेच्या कोणत्याही घटकासाठी असो वा निवडक व्यक्तिसाठी असो, समावेश होतो;

(ख) "समुचित प्राधिकरण", याचा अर्थ, कलम १३ अन्वये नियुक्त केलेले समुचित प्राधिकरण, असा आहे;

(ग) "प्राधिकरण समिती" याचा अर्थ, कलम ९ पोटकलम (४) याच्या खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये घटित करण्यात आलेली समिती, असा आहे;

(घ) "मस्तिष्क स्तंभाचा मृत्यू" याचा अर्थ, ज्या अवस्थेत मस्तिष्क स्तंभाच्या सर्व क्रिया कायमच्या व अप्रत्यावर्तीपणे थांबलेल्या आहेत आणि कलम ३ च्या पोटकलम (६) अन्वये तशा अर्थाचे, प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, अशी अवस्था, असा आहे;

(ङ) "मृत व्यक्ती" याचा अर्थ, ज्या व्यक्तीमध्ये, जी जन्माला आल्यापासून कोणत्याही वेळी मस्तिष्क स्तंभाच्या मृत्युमुळे जिवंतपणाची सर्व लक्षणे कायमची लुप्त पावलेली आहेत किंवा हृदय व फुफ्फुसाच्या संवेदना बंद पडलेल्या आहेत, अशी व्यक्ती, असा आहे;

(च) "दाता" याचा अर्थ, किमान अठरा वर्षे वयाची असलेली जी व्यक्ती, कलम ३ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खालील उपचाराच्या प्रयोजनासाठी आपले कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याकरता स्वेच्छेने प्राधिकार देते अशी व्यक्ती, असा आहे;

(छ) "रुग्णालय" या मध्ये परिचर्यागृह, चिकित्सालय, वैद्यकीय केंद्र, उपचाराच्या प्रयोजनासाठी असलेल्या वैद्यकीय किंवा अध्यापकीय संस्था आणि इतर तत्सम संस्था यांचा अंतर्भाव होतो ;

(ज) "मानवी अवयव" याचा अर्थ, ऊतींची संरचना असलेला मानवी शरीरातील जो भाग पूर्णत: काढून टाकल्यावर शरीर त्याची प्रतिकृती पुन्हा तयार करू शकत नाही असा मानवी शरीराचा कोणताही भाग, असा आहे ;

(झ) "निकटचा नातेवाईक" याचा अर्थ, पती/पत्नी, मुलगा/मुलगी, पिता, माता, भाऊ किंवा बहीण, असा आहे ;

(ञ) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रकाशित झालेली अधिसूचना, असा आहे ;

(ट) "प्रदान" याचा अर्थ, पैशाचे किंवा पैशाचे मोल असलेल्या वस्तूच्या स्वरूपातील प्रदान, असा आहे, परंतु त्यामध्ये,—

(एक) पुरवण्यात येणारे मानवी अवयव काढणे, त्यांची वाहतूक करणे किंवा ते जतन करून ठेवणे यांचा खर्च;

(दोन) एखाद्या व्यक्तीने आपल्या शरीरातील मानवी अवयव पुरवण्यासाठी वाजवी-रीत्या व प्रत्यक्षपणे केलेला कोणताही खर्च किंवा तिला झालेला उत्पन्नातील तोटा ;

भागविण्यासाठी किंवा त्यांची प्रतिपूर्ती करण्यासाठी केलेल्या कोणत्याही प्रदानाचा अंतर्भाव नाही ;

(ठ) "विहित" याचा अर्थ, ह्या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ड) "ग्रहीता" याचा अर्थ, ज्या व्यक्तीवर कोणत्याही मानवी अवयवाचे प्रतिरोपण करण्यात आले असेल किंवा करावयाचे योजिले असेल अशी व्यक्ती, असा आहे ;

(ढ) "नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, त्याच्याकडे, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) याच्या कलम २ चा खंड (ज) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता आहे आणि जो त्या कलमाच्या खंड (ट) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, राज्य वैद्यक नोंदवहीमध्ये नाव नोंदवलेला आहे असा वैद्यक व्यवसायी, असा आहे ;

(ण) "उपचारांची प्रयोजने" याचा अर्थ, एखाद्या विशिष्ट पद्धतीनुसार किंवा प्रणाली-नुसार एखाद्या रोग्यावर पद्धतशीर उपचार करणे किंवा आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना करणे, असा आहे ; आणि

(त) "प्रतिरोपण" याचा अर्थ, एखाद्या जिवंत व्यक्तीच्या किंवा मृत व्यक्तीच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव काढून घेऊन ते उपचाराच्या प्रयोजनांकरिता दुसऱ्या जिवंत व्यक्तीच्या शरीरावर अभिरोपण करणे, असा आहे.

## प्रकरण दोन

### मानवी अवयव काढून घेण्यासाठी प्राधिकार

**मानवी अवयव काढून घेण्यासाठी प्राधिकार.** ३. (१) कोणताही दाता, विहित करण्यात येईल अशा रीतीने, आणि तशा शर्तींना अधीन राहून, त्याच्या मृत्यूपूर्वी त्याच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव उपचाराच्या प्रयोजनासाठी काढून घेण्याचे प्राधिकार देऊ शकेल.

(२) जर एखाद्या दात्याने त्याच्या मृत्यूपूर्वी कोणत्याही वेळी, लेखी आणि दोन किंवा अधिक साक्षीदारांच्या समक्ष (ज्यांच्यापैकी किमान एक अशा व्यक्तीचा निकट नातेवाईक असावा.) असे निस्सं-दिग्धपणे, प्राधिकार दिले असतील की, त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या शरीरातून कोणतेही मानवी अवयव उपचाराच्या प्रयोजनासाठी काढून घेण्यात यावा तर त्या दात्याच्या मृत शरीराचा कायदेशीर ताबा असणारी व्यक्ती, जर त्या दात्याने नंतर कधीतरी उपरोक्त प्राधिकार रद्द केलेला आहे असे मानल्यास त्या व्यक्तीस कोणतेही वाजवी कारण नसेल तर, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीला त्या दात्याच्या मृत शरीरातून मानवी अवयव उपचाराच्या प्रयोजनासाठी काढून घेण्याकरिता सर्व वाजवी सोयी पुरवील.

(३) पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या प्रमाणे एखाद्या व्यक्तीने तिच्या मृत्यूपूर्वी असे प्राधिकार जेव्हा दिलेले नसतील परंतु तिच्या मृत्यूनंतर तिच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव उपचाराच्या प्रयोजनासाठी वापरण्याकरिता हरकत असल्याचेही व्यक्त केलेले नसेल तेव्हा, अशा व्यक्तीच्या मृत शरीराचा कायदेशीर ताबा असणारी व्यक्ती जर त्या मृत व्यक्तीच्या शरीरातील मानवी अवयव उपचाराच्या प्रयोजनार्थ वापरण्याकरिता त्या मृत व्यक्तीच्या कोणत्याही निकटच्या नातलगाची हरकत आहे असे मानल्यास त्या (ताबा असणाऱ्या) व्यक्तीला वाजवी कारण नसेल तर, त्या व्यक्तीच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव उपचाराच्या प्रयोजनार्थ वापरण्याकरिता काढून घेण्याचे प्राधिकार देईल.

(४) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) किंवा यथास्थिति पोटकलम (३) अन्वये दिलेले प्राधिकारपत्र हे, उपचाराच्या प्रयोजनासाठी मानवी अवयव काढून घेण्याकरिता पुरेसे आश्वासन (वॉरंट) असल्याचे मानण्यात येईल ; परंतु नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडून असे अवयव काढण्याचे काम केले जाणार नाही.

(५) जेव्हा एखाद्या मृत व्यक्तीच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव काढून घ्यावयाचा असेल तेव्हा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी, अवयव काढून घेण्यापूर्वी ज्या मृत शरीरातून असा अवयव काढून घ्यावयाचा असेल त्याची स्वत: तपासणी करून अशी खात्री करून घेईल की, त्या शरीरात प्राण नाही किंवा मस्तिष्क स्तंभाच्या मृत्यूची ती बाब असल्याचे दिसून येईल तेव्हा अशा मृत्यूबाबत पोटकलम (६) अन्वये प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(६) मस्तिष्क स्तंभाचा मृत्यू झालेल्या प्रकरणी, त्या व्यक्तीच्या शरीरातून जेव्हा एखादे मानवी अवयव काढून घ्यावयाचा असेल तेव्हा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने पुढील व्यक्तींचा समावेश असलेले वैद्यकीय तज्ज्ञांच्या मंडळाकडून तो मृत्यू प्रमाणित करण्यात आल्याशिवाय व विहित करण्यात येईल अशा अटींचे व शर्तींचे अनुपालन केल्याशिवाय कोणतेही अवयव काढून घेण्यात येणार नाही :—

(एक) ज्या रुग्णालयात मस्तिष्क स्तंभाच्या मृत्यूचे प्रकरण घडले असेल त्याचा प्रभारी नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी ;

(दोन) खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीने, समुचित प्राधिकरणाकडून मान्यता मिळालेल्या नावांच्या पॅनलमधून नामनिर्देशित केलेला व विशेषज्ञ असलेला एक स्वतंत्र नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी ;

(तीन) खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेला नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी, किंवा समुचित प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात आलेल्या नावांच्या पॅनलमधून नामनिर्देशित करावयाचा एक चेताशास्त्रज्ञ किंवा चेताशल्य चिकित्सक; आणि

(चार) ज्या व्यक्तीचा मस्तिष्क स्तंभाचा मृत्यू झाला असेल त्या व्यक्तीवर उपचार करणारा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी.

(७) पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या एखाद्या व्यक्तीच्या मस्तिष्क स्तंभाचा मृत्यू होतो आणि पोटकलम (६) अन्वये तो प्रमाणित करण्यात येतो तेव्हा त्या मृत व्यक्तीच्या आईवडिलांपैकी कोणालाही, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, त्या मृत व्यक्तीच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव काढून घेण्यासाठी प्राधिकार देता येतील.

विवक्षित प्रकरणांमध्ये मानवी अवयव काढून घेण्याचे प्राधिकार न देणे.

४. (१) मृत व्यक्तीच्या शरीरातील कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याकरिता जिने सुविधा देणे आवश्यक आहे किंवा तसे प्राधिकार देण्याची शक्ती जिला प्रदान केलेली आहे त्या व्यक्तीला जर असे सकारण वाटत असेल की, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांना अनुलक्षून त्या मृत व्यक्तीच्या शरीरासंबंधात मरणान्वेषण करणे आवश्यक आहे तर कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये कोणतीही सुविधा आणि त्या कलमाच्या पोट कलम (३) अन्वये कोणतेही प्राधिकार देण्यात येणार नाहीत.

(२) ज्या व्यक्तीकडे मृत शरीर केवळ दफनाच्या, दहनाच्या किंवा अन्य विल्हेवाटीच्या प्रयोजनासाठी सोपविण्यात आले असेल त्या व्यक्तीला अशा मृत शरीरातून कोणतेही मानवी अवयव काढण्यासाठी प्राधिकार देण्यात येणार नाहीत.

रुग्णालय किंवा कारागृह येथील दावा न सांगितलेल्या मृतदेहांच्या बाबतीत मानवी अवयव काढण्याचा प्राधिकार.

५. (१) जो मृतदेह, रुग्णालय, किंवा कारागृह येथे पडून राहिलेला आहे व मृत व्यक्तीच्या कोणत्याही नजिकच्या नातेवाईकाने संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या वेळेपासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत त्याबाबत कोणताही दावा सांगितलेला नाही अशा बाबतीत, असा दावा सांगितल्या शिवाय, पडून राहिलेल्या मृत शरीरातून मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार, ज्या व्यक्तीकडे, त्या काळी, रुग्णालय, किंवा कारागृह याच्या व्यवस्थापनाचा किंवा नियंत्रणाचा प्रभार आहे त्या व्यक्तीकडून किंवा त्याच्या व्यवस्थापनाचा किंवा नियंत्रणाचा प्रभार असलेल्या व्यक्तीने याबाबतीत प्राधिकृत केले असेल अशा त्या रुग्णालयाच्या किंवा कारागृहाच्या कर्मचाऱ्याकडून विहित नमुन्यात देण्यात येईल.

(२) जर असा प्राधिकार देण्यासाठी शक्ती प्रदान करण्यात आलेल्या व्यक्तीला, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत मृत व्यक्तीच्या देहाबाबत दावा सांगण्यासाठी कोणताही नजिकचा नातेवाईक पुढे आला नसला तरीही अशा मृत व्यक्तीचा कोणताही नजिकचा नातेवाईक मृत शरीराचा दावा सांगण्याची शक्यता आहे, असे मानण्यास संयुक्तिक कारण असेल तर, पोटकलम (१) खाली कोणताही प्राधिकार देण्यात येणार नाही.

मरणोत्तर तपासणीसाठी पाठवण्यात आलेल्या मृत देहातून, न्याय, वैद्यक किंवा विकृति-चिकित्सेच्या प्रयोजनांसाठी मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार.

६. व्यक्तीचे शरीर---

(क) अशा व्यक्तीचा मृत्यू अपघाताद्वारे किंवा कोणत्याही इतर अनैसर्गिक कारणामुळे झाला आहे या कारणास्तव न्यायवैद्यक प्रयोजनांसाठी; किंवा

(ख) विकृतिशास्त्राच्या प्रयोजनांसाठी, शवपरीक्षेकरिता पाठवण्यात आले असेल अशा मृत देहातून कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार देण्यासाठी या अधिनियमान्वये सक्षम असलेल्या व्यक्तीला, असा देह ज्या प्रयोजनास्तव शवपरीक्षेसाठी पाठवण्यात आला त्यासाठी अशा मानवी अवयवाची आवश्यकता पडणार नाही असे मानण्यास संयुक्तिक कारण असल्यास, मृत व्यक्तीचे ते मानवी अवयव रोगनिवारणाच्या प्रयोजनासाठी काढून घेण्याचे प्राधिकार देता येतील, मात्र, मृत व्यक्तीने, त्याच्या मृत्यूनंतर उपचारांच्या प्रयोजनांसाठी त्याच्या कोणत्याही मानवी अवयवाचा वापर करण्याविषयी त्याच्या मृत्यूपूर्वी कोणताही आक्षेप व्यक्त केला नाही किंवा, त्याच्या मृत्यूनंतर उपचारांच्या प्रयोजनांसाठी त्याच्या कोणत्याही अवयवाचा वापर करण्याविषयीचे प्राधिकारपत्र दिले असेल अशा बाबतीत, असे प्राधिकारपत्र त्याने त्याच्या मृत्यूपूर्वी प्रत्याहृत केले नव्हते याविषयी त्याने खात्री करून घेतली पाहिजे.

मानवी अवयवांचे जतन करणे.

७. कोणत्याही व्यक्तीच्या देहातून कोणतेही मानवी अवयव काढून घेतल्यानंतर, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी, अशाप्रकारे काढलेल्या मानवी अवयवांचे जतन करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी उपाययोजना करील.

व्यावृत्ती.

८. (१) या अधिनियमाच्या पूर्वोक्त उपबंधांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीचा अर्थ मृत व्यक्तीचा देह किंवा त्या देहाचा कोणताही भाग यासंबंधी केलेले, जर हा अधिनियम संमत झाला नसता तर जे व्यवहार कायदेशीर ठरले असते असे व्यवहार बेकायदेशीर ठरतील, असा लावण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या उपबंधानुसार, मृत व्यक्तीच्या देहातून कोणतेही अवयव काढून घेण्यासाठी कोणतीही सवलत किंवा प्राधिकार देणे किंवा अवयव अशा प्राधिकारास अनुलक्षून मृत व्यक्तीच्या देहातून कोणतेही मानवी अवयव काढून घेणे ही बाब, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २९७ खालील दंडणीय अपराध असल्याचे मानण्यात येणार नाही.

मानवी अवयव काढून घेणे व त्याचे शरीरावर प्रतिरोपण करणे यावरील मर्यादा.

९. (१) पोटकलम (३) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्याखेरीज, दात्याच्या शरीरातून त्याच्या मृत्यूपूर्वी काढून घेतलेल्या ग्रहीत्यावर, तो ग्रहीता दात्याचा नजिकचा नातेवाईक असल्याखेरीज, प्रतिरोपण करण्यात येणार नाही.

(२) कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये कोणत्याही दात्याने, त्याच्या मृत्यूनंतर त्याचे कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याविषयीचे प्राधिकारपत्र करून दिले असेल किंवा कोणत्याही मृत व्यक्तीच्या शरीरातून कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार देण्यासाठी सक्षम असलेल्या किंवा शक्ती प्रदान केलेल्या व्यक्तीने असे अवयव काढून घेण्यासाठी प्राधिकारपत्र दिले असेल तर मानवी अवयव काढून घेता येईल व त्याचे अशा मानवी अवयवाची गरज असलेल्या कोणत्याही ग्रहीत्याच्या शरीरावर प्रतिरोपण करता येईल.

(३) जर कोणत्याही दात्याने, ग्रहीत्याविषयीचा जिव्हाळा किंवा आत्मीयता या कारणासाठी किंवा कोणत्याही इतर विशेष कारणांसाठी, दात्याकडून विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्याप्रमाणे नजिकच्या नातेवाईक नसलेल्या अशा ग्रहीत्याच्या शरीरात प्रतिरोपण करण्यासाठी त्याच्या मृत्यूनंतर त्याचे कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याविषयीचे प्राधिकारपत्र करून दिले असेल तर, प्राधिकार देणाऱ्या समितीच्या मान्यते-खेरीज, असे कोणतेही मानवी अवयव काढून घेण्यात येणार नाही आणि त्याचे प्रतिरोपण करण्यात येणार नाही.

(४) (क) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, या कलमाच्या प्रयोजनासाठी प्रत्येक संघराज्य क्षेत्राकरिता अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींवर व शर्तीवर केंद्र शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशा सदस्यांचा समावेश असलेल्या एक किंवा अधिक प्राधिकार देणाऱ्या समित्या घटित करील;

(ख) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, या कलमाच्या प्रयोजनांसाठी अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींवर व शर्तीवर राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील अशा सदस्यांचा समावेश असलेल्या एक किंवा अधिक प्राधिकरण समित्या घटित करील.

(५) दाता व ग्रहीता यांनी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व अशा रीतीने संयुक्तरीत्या अर्ज केल्यावर प्राधिकार देणारी समिती, चौकशी केल्यानंतर व या अधिनियमातील व त्याअन्वये केलेल्या नियमातील सर्व आवश्यक बाबींचे अर्जदारांनी अनुपालन केलेले आहे याविषयी स्वत:ची खात्री करून घेतल्यावर अर्जदारांना मानवी अवयव काढून त्याचे प्रतिरोपण करण्यास मान्यता देईल.

(६) चौकशी केल्यानंतर आणि अर्जदारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अर्जदारांनी या अधिनियमातील व त्याअन्वये केलेल्या नियमातील आवश्यक बाबींचे अनुपालन केले नाही याविषयी प्राधिकार देणाऱ्या समितीची खात्री झाल्यास, ती लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव अर्जदारास मान्यता देण्याचे नाकारील.

## प्रकरण तीन

### रुग्णालयांचे नियमन

**मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन व प्रतिरोपण ही कार्ये पार पाडणाऱ्या रुग्णालयांचे नियमन.**

१०. (१) या अधिनियमास प्रारंभ झाला त्या दिवशी व तेव्हापासून,–

(क) कोणतेही रुग्णालय, त्याची या अधिनियमान्वये नोंदणी झालेली असल्याखेरीज कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन किंवा प्रतिरोपण ही कार्ये पार पाडणार नाही, त्यात त्याचा सहयोग असणार नाही किंवा त्यासाठी ते मदत करणार नाही;

(ख) कोणताही वैद्यक व्यवसायी किंवा कोणतीही इतर व्यक्ती, या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आली असेल अशा जागेखेरीज अन्य जागी कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन करणे किंवा त्यांचे प्रतिरोपण करणे याच्याशी संबंधित कोणतीही क्रिया स्वतःहून किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीमार्फत करणार नाही, करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा करण्यासाठी सहाय्य करणार नाही; आणि

(ग) कलम १५ पोटकलम (१) खाली नोंदणी केलेल्या रुग्णालयाचा समावेश असलेल्या कोणत्याही जागेचा, उपचारांच्या प्रयोजनासाठी असेल त्याखेरीज, कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन करणे किंवा त्यांचे प्रतिरोपण करणे यासाठी वापर करण्यात येणार नाही किंवा वापर करण्याची व्यवस्था करण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी, उपचारांच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही दात्याच्या मृत देहाचे डोळे किंवा कान कोणत्याही ठिकाणी काढून घेऊ शकेल.

*स्पष्टीकरण.*—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ "कान" या शब्दप्रयोगामध्ये कर्णपटल व कर्णास्थी यांचा समावेश होतो.

**उपचाराच्या प्रयोजनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रयोजनाकरिता मानवी अवयव काढून घेण्यास किंवा त्याच्या प्रतिरोपणास प्रतिषेध.**

**११.** कोणताही दाता, आणि कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार देण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, उपचाराच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता कोणतेही मानवी अवयव काढून घेण्याचा प्राधिकार देणार नाही.

**दाता व ग्रहीता यांना परिणाम, इत्यादींची स्पष्ट कल्पना देणे.**

**१२.** कोणत्याही नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी अवयव काढून घेण्यामुळे होणारे सर्व संभाव्य परिणाम होणारी गुंतागुंत व उद्भवणाऱ्या समस्या यांच्या संबंधात त्याने अनुक्रमे दाता व ग्रहिता यांना, विहित करण्यात येईल अशा रीतीने स्पष्ट कल्पना दिली असल्याखेरीज, कोणतेही मानवी अवयव काढून घेणार नाही किंवा त्याचे प्रतिरोपण करणार नाही.

## प्रकरण चार

### समुचित प्राधिकरण

**समुचित प्राधिकरण.**

**१३.** (१) केंद्र शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ प्रत्येक संघराज्य, क्षेत्राकरिता, एका किंवा त्याहून अधिक अधिकाऱ्यांची, अधिसूचनेद्वारे, समुचित प्राधिकरणे म्हणून नियुक्ती करील.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन, एका किंवा त्याहून अधिक अधिकाऱ्यांची समुचित प्राधिकरणे म्हणून नियुक्ती करील.

(३) समुचित प्राधिकरण पुढील कामे करील :—

(एक) कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये नोंदणीस मान्यता देणे किंवा त्या कलमाच्या पोटकलम (३) अन्वये नोंदणीच्या नवीकरणास मान्यता देणे;

(दोन) कलम १६ च्या पोटकलम (२) अन्वये नोंदणी निलंबित किंवा रद्द करणे;

(तीन) कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, तो जतन करणे किंवा त्याचे प्रतिरोपण करणे या कामी गुंतलेल्या रुग्णालयांसाठी विहित करण्यात येतील अशी मानके लागू करणे;

(चार) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचा किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचा भंग झाल्याबद्दल करण्यात आलेल्या कोणत्याही तक्रारीची चौकशी करणे व योग्य ती कार्यवाही करणे;

(पाच) प्रतिरोपणाचा दर्जा तसेच ज्याच्यावर प्रतिरोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे व ज्यांचे अवयव काढून घेण्यात आले आहेत अशा व्यक्तींची अनुवर्ती वैद्यकीय शुश्रूषा, देखरेख कितपत केली जाते याची तपासणी करण्याकरिता रुग्णालयांचे नियतकालिक निरीक्षण करणे; आणि

(सहा) विहित करण्यात येतील अशी इतर उपाययोजना करणे.

## प्रकरण पाच

### रुग्णालयांची नोंदणी

मानवी अवयव काढून घेणे, त्यांचे जतन करणे किंवा त्यांचे प्रतिरोपण करणे या कामी गुंतलेल्या रुग्णालयांची नोंदणी.

१४. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कोणतेही रुग्णालय, त्याची या अधिनियमाखाली यथोचितरीत्या नोंदणी करण्यात आली असल्याखेरीज, वैद्यकीय उपचाराच्या प्रयोजनार्थ, कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, त्याचे जतन करणे किंवा त्याचे प्रतिरोपण करणे या बाबींशी संबंधित कोणतेही काम करणार नाही:

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, वैद्यकीय उपचाराच्या प्रयोजनार्थ, कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, त्याचे जतन करणे किंवा त्याचे प्रतिरोपण करणे या बाबींच्या संबंधातील कोणत्याही कामात अंशतः किंवा पूर्णपणे गुंतलेले प्रत्येक रुग्णालय, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करील;

परंतु आणखी असे की, कोणतेही मानवी अवयव काढून घेणे, त्याचे जतन करणे किंवा त्याचे प्रतिरोपण करणे या बाबींच्या संबंधातील कोणतेही काम करणारे प्रत्येक रुग्णालय, अशा रुग्णालयाने नोंदणीसाठी अर्ज केला असेल व अशा प्रकारे त्यांची नोंदणी झाली असेल किंवा असा अर्ज निकालात काढण्यात आला असेल, यापैकी जे आधीचे असेल ते बेरीज करून या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून तीन महि-न्यांचा कालावधी संपल्यानंतर असे काम पार पाडण्याचे बंद करील.

(२) पोटकलम (१) अन्वये नोंदणीसाठी करण्यात आलेला प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने व अशा फी सोबत करण्यात येईल.

(३) कोणतेही रुग्णालय, विहित करण्यात येईल अशा विशेष सेवा व सुविधा पुरविण्यास समर्थ आहे, विहित करण्यात येईल असे कुशल मनुष्यबळ व सुसज्ज साधनसामग्री त्याच्याकडे आहे व विहित करण्यात येईल असा दर्जा त्याने राखला आहे याबद्दल समुचित प्राधिकरणाची खात्री पटली नसेल तर अशा कोणत्याही रुग्णालयाची या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात येणार नाही.

नोंदणी प्रमाणपत्र.

१५. (१) अर्जदार रुग्णालयाने या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व आवश्यकतांचे अनुपालन केले आहे याबद्दल चौकशी केल्यानंतर व त्याबाबत स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर, समुचित प्राधिकरण, त्या रुग्णालयाला विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा मुदती-करिता व अशा शर्तींस अधीन राहून नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(२) चौकशी केल्यानंतर व अर्जदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अर्ज-दाराने या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या आवश्यकतांचे पालन केलेले नाही याबद्दल समुचित प्राधिकरणाची खात्री झाल्यास, ते, नोंदणीसाठी करण्यात आलेला अर्ज फेटाळून लावील व त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करील.

(३) प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्राचे, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशी फी भरल्यानंतर नवीकरण करण्यात येईल.

नोंदणी निलंबित किंवा रद्द करणे.

१६. (१) समुचित प्राधिकरण, स्वतः होऊन किंवा त्याच्याकडे तक्रार आल्यावरून, कोणत्याही रुग्णालयाला एक नोटीस पाठवून, तीत नमूद केलेल्या कारणावरून या अधिनियमाखालील त्याची नोंदणी का निलंबित किंवा रद्द करण्यात येऊ नये याबद्दलची कारणे दाखवण्यास फर्मावू शकेल.

(२) रुग्णालयाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही उपबंधांचा भंग झाला आहे याबद्दल समुचित प्राधिकरणाची खात्री झाल्यास, ते प्राधिकरण, अशा रुग्णालयाविरुद्ध ते करील अशा फौजदारी कारवाईस बाध न आणता, त्यास योग्य वाटेल एवढ्या कालावधीकरिता, अशा रुग्णालयाची नोंदणी निलंबित करू शकेल; किंवा त्याची नोंदणी रद्द करू शकेल:

परंतु, लोकहितार्थ तसे करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे असे समुचित प्राधिकरणाचे मत असेल तर, प्राधिकरण, लेखी कारणे नमूद करून, कोणतीही नोटीस न देता, कोणत्याही रुग्णालयाची नोंदणी निलंबित करील.

अपिले.

१७. कलम ९ च्या पोटकलम (६) अन्वये मान्यतेसाठी केलेला अर्ज फेटाळणाऱ्या प्राधिकरण समितीच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, किंवा कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये नोंदणीसाठी आलेला अर्ज फेटाळण्याच्या समुचित प्राधिकरणाच्या आदेशामुळे किंवा कलम १६ च्या पोट कलम

(२) अन्वये नोंदणीच्या, निलंबनाच्या किंवा रद्द करण्याविषयीच्या आदेशामुळे व्यथित झालेले कोणतेही रुग्णालय, आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, अशा आदेशाविरूद्ध, विहित करण्यात येईल अशा रीतीने;—

(एक) कलम ९ च्या पोटकलम (४) खंड (क) अन्वये घटित केलेल्या प्राधिकरण समितीच्या आदेशाविरूद्ध किंवा कलम १३ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या समुचित प्राधिकरणाच्या आदेशाविरूद्ध अपिल केले असेल त्याबाबतीत केंद्र शासनाकडे; किंवा

(दोन) कलम ९ च्या पोटकलम (४) खंड (ख) अन्वये घटित केलेल्या प्राधिकार देण्याच्या समितीच्या आदेशाविरूद्ध किंवा कलम १३ च्या पोटकलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या समुचित प्राधिकरणाच्या आदेशाविरूद्ध अपिल केले असेल त्याबाबतीत, राज्य शासनाकडे;

अशा आदेशाविरूद्ध अपिल करू शकेल.

## प्रकरण सहा

### अपराध व शास्ती

१८. (१) एखादी व्यक्ती आपल्या सेवा प्रतिरोपणाच्या प्रयोजनासाठी एखाद्या रुग्णालयाला देऊन प्राधिकाराशिवाय मानवी अवयव काढण्याची कृती करीत असेल किंवा त्यात सहयोग देत असेल किंवा कोणत्याही रीतीने प्राधिकाराशिवाय मदत करीत असेल तर ती व्यक्ती पाच वर्षांपर्यंत वाढवता येईल अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल. प्राधिकाराशिवाय मानवी अवयव काढण्याबद्दल शिक्षा.

(२) कलम १ खाली सिद्धदोष ठरवण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी असेल, त्याबाबतीत, त्या व्यक्तीचे नाव, पहिल्या अपराधाबद्दल दोन वर्षासाठी आणि नंतरच्या अपराधाबद्दल नेहमीसाठी परिषदेच्या नोंदवहीतून काढून टाकण्यासकट आवश्यक ती कार्यवाही करण्याकरिता, संबंधित राज्य वैद्यक परिषदेला समुचित प्राधिकरणाकडून कळवण्यात येईल.

१९. जो कोणी,— मानवी अवयवांचा वाणिज्यिक व्यवहाराबद्दल शिक्षा.

(क) कोणतेही मानवी अवयव पुरवण्याबद्दल किंवा अवयव देऊ करण्याबद्दल कोणतीही रक्कम प्रदान करील किंवा रक्कम स्वीकारील;

(ख) कोणतेही मानवी अवयव पैसा देऊन पुरवण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती शोधून काढण्याचा प्रयत्न करील;

(ग) पैशासाठी कोणतेही मानवी अवयव पुरवण्यासाठी देऊ करील;

(घ) मानवी अवयव पुरवण्याबद्दल किंवा तो पुरवण्यासाठी देऊ करण्याबद्दल कोणतीही रक्कम प्रदान करण्याचा ज्यात संबंध आहे अशी कोणतीही व्यवस्था करण्यास सुरूवात करील किंवा त्याबाबत वाटाघाटी करील;

(ङ) जिच्या कार्यामध्ये खंड (घ) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यवस्थेची सुरुवात किंवा वाटाघाटी यांचा अंतर्भाव किंवा समावेश असतो अशा व्यक्तींच्या निकायाचे, मग ती सोसायटी, पेढी किंवा कंपनी असो, व्यवस्थापन किंवा नियंत्रण यामध्ये भाग घेईल; किंवा

(च) (क) कोणतेही मानवी अवयव पैशाच्या मोबदल्यात पुरवण्यासाठी व्यक्तींना बोलावणारी;

(ख) कोणतेही मानवी अवयव पैशाच्या मोबदल्यात पुरवण्यासाठी देऊ करणारी; किंवा

(ग) खंड (घ) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यवस्थेस सुरूवात करण्यास किंवा त्याबाबत वाटाघाटी करण्यास जाहिरातदार इच्छुक आहे हे दर्शवणारी;

कोणतीही जाहिरात प्रसिद्ध करील किंवा वितरित करील किंवा प्रसिद्ध करण्याची किंवा वितरित करण्याची व्यवस्था करील तो, दोन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु सात वर्षांपर्यंत वाढू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत वाढू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात कोणतेही पुरेसे व विशेष कारण नमूद करून, दोन वर्षांपेक्षा कमी मुदतीच्या कारावासची आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी असेल अशी द्रव्यदंडाची शिक्षा लादू शकेल.

२०. जो कोणी, या अधिनियमाखाली ज्याच्यासाठी स्वतंत्रपणे उपबंध करण्यात आलेला नाही असे, या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा नोंदणीच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील त्याला तीन वर्षांपर्यंत वाढवता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल एवढी द्रव्यदंडाची शिक्षा होईल. या अधिनियमांच्या इतर कोणत्याही उपबंधांच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

कंपन्यांनी केलेले अपराध. २१. (१) या अधिनियमाखालील शिक्षापात्र असा कोणताही अपराध कंपनीने केला असेल तर अपराध घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज चालनाबद्दल जी व्यक्ती कंपनीची प्रभारी किंवा तिला जबाबदार होती. अशी प्रत्येक व्यक्ती तसेच ती कंपनी गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा मिळण्यास ती पात्र होईल:

परंतु, जर अशा व्यक्तीने अपराध आपल्या नकळत घडून आला किंवा असा गुन्हा घडू नये यासाठी आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती हे शाबीत केले तर, या पोट कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही असले तरी जर या अधिनियमाखालील शिक्षापात्र असा कोणताही अपराध कंपनीने केलेला असेल आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मुकानुमतीने घडला होता किंवा त्यांनी केलेल्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्यानुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यात, पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा भागीदारी संस्थेच्या संबंधातील अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

अपराधाची दखल घेणे. २२. (१) या अधिनियमान्वये न्यायालय,—

(क) संबंधित समुचित प्राधिकरणाने किंवा केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने किंवा प्रकरणपरत्वे, समुचित, प्राधिकरणाने या संबंधात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने ; किंवा

(ख) जिने विहित करण्यात येईल अशा रीतीने संबंधित समुचित प्राधिकरणाला अभिकथित अपराधाची आणि न्यायालयाकडे तक्रार करण्याच्या तिच्या उद्देशाची कमीतकमी साठ दिवसांची नोटीस दिली असेल, अशा व्यक्तीने;

तक्रार केलेली असेल त्याखेरीज एरवी अपराधांची दखल घेणार नाही.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्गाचा न्याय दंडाधिकारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही न्यायालय, या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्याय चौकशी करणार नाही.

(३) पोटकलम (१) च्या खंड (ख) अन्वये, तक्रार केली असेल त्याबाबतीत, न्यायालय, अशा व्यक्तीच्या मागणीवरून, समुचित प्राधिकरणाला, त्याच्या ताब्यात असलेल्या संबध्द अभिलेखाच्या प्रती, त्या व्यक्तीला उपलब्ध करून देण्याचा निदेश देऊ शकेल.

## प्रकरण सात

### संकीर्ण

सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीला संरक्षण. २३. (१) या अधिनियमाच्या उपबंधानुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या उपबंधानुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे घडून आलेल्या किंवा घडण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीबद्दल, केंद्र शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

नियम करण्याची शक्ती. २४. (१) केंद्र शासन, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषेकरून, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाधा न येता, अशा नियमाद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींकरिता उपबंध करता येतील, त्या बाबी म्हणजे :—

(क) कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये, ज्या रीतीने आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने कोणताही दाता, त्याच्या मृत्यूपूर्वी त्याच्या देहाचा कोणताही मानवी अवयव काढून घेण्यास प्राधिकार देऊ शकेल ती रीत आणि त्या शर्ती;

(ख) कलम ३ च्या पोटकलम (६) अन्वये, मस्तिष्क स्तंभाचा मृत्यू झाल्याचे ज्या, रीतीने व ज्या नमुन्यात प्रमाणित करण्यात येईल तो नमुना व ती रीत आणि त्या प्रयोजनार्थ ज्या शर्ती व आवश्यक बाबींची पूर्तता करावी लागेल, त्या शर्ती व आवश्यक बाबी;

(ग) कलम ३ च्या पोटकलम (७) अन्वये, अज्ञान व्यक्तीच्या मस्तिष्क स्तंभाच्या मृत्यू प्रकरणी कोणतेही मानवी अवयव काढण्यासाठी पालकांपैकी कोणालाही ज्या नमुन्यात आणि ज्या रीतीने प्राधिकार देता येईल, तो नमुना व ती रीत;

(घ) कलम ५ च्या पोटकलम (१) अन्वये रुग्णालय किंवा कारागृह याच्या व्यवस्थापनाच्या व नियंत्रणाचा प्रभार असलेली व्यक्ती, बेवारशी मृत देहातील कोणतेही मानवी अवयव काढून घेण्यासाठी ज्या नमुन्यात प्राधिकार देऊ शकेल, तो नमुना;

(ङ) कलम ७ अन्वये, कोणत्याही व्यक्तीच्या शरीरातून काढलेले मानवी अवयव जतन करून ठेवण्यासाठी योजावयाच्या उपाययोजना;

(च) कलम ९ च्या पोटकलम (५) अन्वये, दाता आणि ग्रहीता ज्या नमुन्यात व ज्या रीतीने संयुक्तपणे अर्ज करू शकेल तो नमुना व ती रीत;

(छ) कलम १२ अन्वये, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीने, दात्याला आणि ग्रहीत्याला अवयव काढल्यामुळे किंवा प्रतिरोपण केल्यामुळे त्याच्याशी संबंधित असलेले सर्व संभाव्य परिणाम, समस्या आणि धोके ज्या रीतीने स्पष्ट करावयाचे ती रीत;

(ज) कलम १३ च्या पोटकलम (३) च्या खंड (तीन) अन्वये, ज्या रुग्णालयात कोणतेही मानवी अवयव काढणे आणि त्याचे जतन करणे किंवा प्रतिरोपण करणे ही कामे केली जात असतील त्या रुग्णालयात समुचित प्राधिकरणाने अंमलात आणावयाची मानके;

(झ) समुचित प्राधिकरणाने कलम १३ च्या पोटकलम (३) च्या खंड (अकरा) खालील त्याची कार्ये पार पाडण्यासाठी हाती घ्यावयाचे अन्य उपाय;

(ञ) कलम १४ च्या पोटकलम (२) अन्वये, नोंदणी करण्यासाठी ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करावयाचा तो नमुना व ती रीत आणि त्या अर्जासोबत द्यावयाची फी;

(ट) कलम १४ च्या पोटकलम (३) अन्वये, नोंदणी करण्यासाठी रुग्णालयाने पुरवावयाच्या विशेषज्ञांच्या सेवा व सुविधा आणि ठेवावयाची साधनसामुग्री व राखावयाचा दर्जा;

(ठ) कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये रुग्णालयाला ज्या नमुन्यात, ज्या कालावधीकरिता आणि ज्या शर्तीच्या अधीनतेने नोंदणी प्रमाणपत्र द्यावयाचे तो नमुना, तो कालावधी आणि त्या शर्ती;

(ड) कलम १५ च्या पोटकलम (३) अन्वये, ज्या रीतीने आणि जी फी भरल्यावर नोंदणी प्रमाणपत्राचे नवीकरण करण्यात येईल, ती रीत व ती फी;

(ढ) कलम १७ अन्वये ज्या रीतीने अपील करता येईल ती रीत;

(ण) कलम २२, पोटकलम (१) खंड (ख) अन्वये, एखाद्या व्यक्तीने, अभिकथित अपराधाची आणि न्यायालयाकडे तक्रार करण्याच्या त्याच्या उद्देशाची नोटीस समुचित प्राधिकरणाला ज्या रीतीने द्यावयाची ती रीत ;

(त) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखालील केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शुन्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

२५. (१) कर्ण पटल आणि कर्ण अस्थि (उपचार शास्त्रीय प्रयोजनार्थ उपयोग करण्यासाठी प्राधिकार) अधिनियम, १९८२ (१९८२ चा २८) आणि नेत्र (उपचार शास्त्रीय प्रयोजनार्थ उपयोग करण्यासाठी प्राधिकार) अधिनियम, १९८२ (१९८२ चा २९) हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

(२) तथापि, या निरसनामुळे, निरसित केलेल्या अधिनियमांच्या पूर्व प्रवर्तनावर अथवा त्याखाली रीतसर केलेल्या किंवा करावयाच्या राहिलेल्या कोणत्याही गोष्टीवर परिणाम होणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.